कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांच्या वैधानिक लेखापरिक्षणासाठी नेमलेली अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

शासन निर्णय क्रमांक: -अस्थामु-२०१९/प्र.क्र.४०/१-स

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.

दि. ०४ मे, २०१९

<u>वाचा:-</u>

१. शासन निर्णय क्रमांक: -राजस १००८/प्र.क्र.५३८/५-स, दि.०५.०५.२०११.
२. शासन निर्णय क्रमांक: -मुदवा-२२१८/प्र.क्र.८८/९-स, दि.०५.०४.२०१८.
३. शासन निर्णय क्रमांक: -अस्थाप-२०१८/प्र.क्र.१५५/१-स, दि.२९.१०.२०१८.
४. वित्त विभाग शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.२१.०२.२०१९.
५. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्र.आस्थापना/कक्ष-१/कृषि प्रक्रिया संस्था/१०६१/मुदतवाढ/२५६, दि.२८.०२.२०१९.
६. शासन निर्णय क्रमांक: -अस्थामु-२०१९/प्र.क्र.४०/१-स, दि.१५.०४.२०१९.
७. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्र.सआ/लेप.१९/कृ. प्रक्रिया पद पुढे चालू/६५३/२०१९, दि.२२.०४.२०१९.

<u>प्रस्तावना : -</u>

संदर्भ-१ येथील शासन निर्णयान्वये सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयातील स्थायी/अस्थायी पदांच्या आढाव्यानुसार एकूण ९,३१९ पदांच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर आकृतीबंधातील पदांच्या तालुका/जिल्हा/विभाग/मुख्यालय स्तरावरील कार्यालयनिहाय वाटपाचे तपशिलवार आदेश निर्गमित करण्याच्या सूचना सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना देण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार, कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांसाठी ३२ पदांच्या तालुका/जिल्हा/विभाग/मुख्यालय स्तरावरील कार्यालयनिहाय वाटपाचे आदेश सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून निर्गमित करण्यात आलेले आहेत.

२. कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणासाठी मंजूर सदर ३२ अस्थायी पदांना दि.०१.१०.२०१८ ते दि.२८.०२.२०१९ या कालावधीसाठी **वाचा क्र. ३** येथील, दिनांक २९.१०.२०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर अस्थायी पदे सन २०१८-१९ करिता पुढे चालू ठेवण्याबाबत (Continuation Of Temporary Posts) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वरील **संदर्भ ५** येथील पत्रान्वये प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे. सदर पदांचे अवलोकन केले असता, ज्या ठिकाणी कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्य वितरित करण्यात आलेले आहे, त्या जिल्ह्यात सदर

पदांचे वाटप झालेले नाही, असे दिसून येते. आतापर्यंत कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना वितरित करण्यात आलेल्या अर्थसहाय्याच्या वसुलीचा आढावा घेण्यात आला असता, अत्यल्प प्रमाणात वसुली झाल्याचे दिसून येते. कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणासाठी निर्माण केलेल्या सदर पदांद्वारे कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांचे कामकाज करण्यात येत नाही, असे दिसून येते. कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना राष्ट्रीय सहकारी विकास निगमाने मंजूर केलेल्या आकृतीबंधानुसार अर्थसहाय्याचे वाटप करताना प्रस्ताव नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आले असता, ज्या संस्थांना यापूर्वी अर्थसहाय्य दिले आहे व ज्या संस्था बंद किंवा अवसायनात गेल्या आहेत त्या संस्थांकडून अर्थसहाय्याची रक्कम वसूल करावी. तसेच, सदर वसुलीसाठी काय यंत्रणा आहे याबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना वित्त व नियोजन विभागाने दिलेल्या आहेत. यापूर्वी देण्यात आलेल्या संस्थांकडून कर्जाची वसुली होत नसल्यामुळे सदर कर्जाचा शासनावर अतिरिक्त बोजा पडतो. ही बाब विचारात घेता तसेच क्षेत्रीय कार्यालयातील स्थायी/अस्थायी पदांच्या मंजूर आकृतीबंधानुसार कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणासाठी निर्माण केलेल्या पदांचे वाटप योग्य प्रकारे झालेले नसल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना देण्यात आलेल्या अर्थसहाय्याची वसुली व शासनास सादर होणारे प्रस्ताव योग्य प्रकारे तपासणी करण्यासाठी कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणासाठी मंजूर ३२ पदांना दि.१५.०४.२०१९ च्या शासन निर्णयान्वये तालुका/जिल्हा/विभाग/मुख्यालय स्तरावरील कार्यालयनिहाय सुधारित वाटपानुसार दि.०१.०३.२०१९ ते दि.३०.०९.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्याचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तथापि, **संदर्भ क्र.७** येथील पत्रान्वये केलेल्या विनंतीस अनुसरुन सुधारित मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

शासन याबाबतीत आता पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणासाठीच्या मंजूर पदांच्या पूर्वीच्या वाटपाच्या आदेशानुसार अधिकारी/कर्मचारी यांना पदस्थापना देण्यात आलेली आहे आणि त्यानुसार सेवार्थ प्रणालीमध्ये नोंद करण्यात आली असल्यामुळे सदर पदांचे वेतन दि.१५.०४.२०१९ च्या शासन निर्णयान्वये सुधारित केलेल्या वाटपानुसार होऊ शकणार नाहीत, त्यामुळे सदर पदांच्या पूर्वीच्या वाटपानुसार मुदतवाढ मंजूर करण्याची विनंती सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा. पुणे या कार्यालयाने दि.२२.०४.२०१९ च्या संदर्भ क्र.७ येथील पत्रान्वये केलेली आहे. सदर पदांचे सुधारित वाटपानुसार आदेश निर्गमित करण्यासाठी व त्यानुसार अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदस्थापना करण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. ही बाब विचारात घेऊन तसेच सध्या कर्मचाऱ्यांचे वेतन देयके पारित होण्याच्या दृष्टीने पूर्वीच्या वाटपानुसार कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणासाठी निर्माण करण्यात आलेल्या ३२ पदांना दि.०१.०३.२०१९ ते दि.३१.०५.२०१९ पर्यंत खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार मुदतवाढ मंजूर करण्यात येत आहे.

योजनेचे नाव: - कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांचे वैधानिक लेखापरिक्षणासाठी कर्मचारी वर्ग.

अ. क्र.	पदनाम	जिल्ह्याचे नाव								एकूण
		ठाणे	रायगड	नाशिक	धुळे	सांगली	बीड	नागपूर	भंडारा	
१	विशेष लेखापरिक्षक वर्ग-२	१	१	०	१	०	०	१	०	४
२	लेखापरिक्षक श्रेणी-१	१	०	०	०	१	१	०	०	३
३	लेखापरिक्षक श्रेणी-२	०	०	१	०	०	०	०	१	२
४	उपलेखापरिक्षक	१	१	०	१	०	०	१	०	४
५	कनिष्ठ लिपिक	३	२	१	२	१	१	१	१	१२
६	शिपाई	२	०	१	१	०	१	१	१	७
	एकूण पदे	८	४	३	५	२	३	४	३	३२

२. सदर मुदतवाढीनंतर म्हणजेच दि.०१.०६.२०१९ नंतर, दि.१५.०४.२०१९ च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आल्यानुसार सदर पदांचे तालुका/जिल्हा/विभाग/मुख्यालय स्तरावर वाटप करुन त्यानुसार सदर पदांवर अधिकारी/कर्मचारी यांची पदस्थापना करण्यात यावी व त्यानुसार सदर पदांना दि.१५.०४.२०१९ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेली दि.३०.०९.२०१९ पर्यंतची मुदतवाढ लागू राहील. सदर मुदतवाढीस दि.१५.०४.२०१९ च्या शासन निर्णयातील सर्व अटी, शर्ती व सूचना लागू राहतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५०४१४५५१२६८०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jaiprakash
Mansaramji Ambade

Digitally signed by Jaiprakash Mansaramji Ambade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Cooperative Marketing, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9ce079d77649e3080d74540a4a9ae7f6502ac7e6273891f24ffda6ebea493dce, serialNumber=d214bfebdf948d521ecc91e9cb1487d0cce508098bc2232154c36daba7635819, cn=Jaiprakash Mansaramji Ambade
Date: 2019.05.04 14:57:56 +05'30'

(ज.म. अंबादे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

०१.मा. राज्यपाल महोदय यांचे प्रधान सचिव
०२.मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव
०३.मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
०४. मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
०५. सर्व मा. विधीमंडळ सदस्य,
०६. महालेखापाल-१ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
०७. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
०८. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
०९. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.

१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१३. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५. सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन/लेखापरिक्षण)
१६. सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
१७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१८. कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय-२/वित्तीय सुधारणा), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१९. कक्ष अधिकारी, सर्व कार्यासने, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२०. निवडनस्ती (१-स).

****